ePaper


“...तर राज्यात पुन्हा महाविकास आघाडीचं सरकार येईल” : उल्हास बापट



| वर्ष - 6 | अंक - 199 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- साखर निर्यात बंदीचा धसका
- ‘महिंद्रा लॉजिस्टिक’ च्या कर्मचाऱ्यांना १२ हजार ८०० रुपयांची पगारवाढ
- बल्क ड्रग पार्क विरोधात शेतकऱ्यांचा मोर्चा


www.mahaenews.com | बुधवार | दिनांक 2 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


### पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने मोहिम

# फेरीवाल्यांचे सर्वेक्षण!

## शहरातील फेरीवाल्यांनी सर्वेक्षण मोहिमेत सहभागी होण्याचे आयुक्त शेखर सिंह यांचे आवाहन

**| पिंपरी |**

**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**महापालिकेच्यावतीने पिंपरी-चिंचवड शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत करण्यात येणार आहे. हे सर्वेक्षण विनामूल्य तसेच बायोमेट्रिक पद्धतीने होणार असून, नोंदणी व सर्वेक्षण सुलभ पद्धतीने होण्यासाठी शहरातील संबंधित फेरीवाल्यांनी आपल्या मोबाईल क्रमांकास आधारकार्ड लिंक (संलग्न) करून या सर्वेक्षणात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.**

फेरीवाला सर्वेक्षणासाठी संबधित फेरीवाल्यांकडे आधारकार्डची छायांकित प्रत, रेशन कार्डचे पहिले पान व शेवटचे पान यांची एका पानावरील छायांकित असणे अनिवार्य आहे. जातप्रमाणपत्राची छायांकित प्रत स्वतःजवळ असावी. दिव्यांग, घटस्फोटीता, परितक्ता महिलांसाठी अनुषंगिक पुराव्याची प्रत असणे गरजेचे आहे. फेरीवाल्यांना यापूर्वी पथविक्रेता प्रमाणपत्र मिळाले असल्यास त्यांनी प्रमाणपत्र सादर करावे. यापूर्वी अतिक्रमण विभागाकडून काही कारवाई झाली असेल तर संबधित दंडाची पावती सोबत असणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील लेटर ऑफ रेकमंडेशनची प्रत किंवा पीएम स्वनिधी कर्ज प्राप्त झाल्याचे कागदपत्र तसेच कोविड १९ च्या कालावधीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने फेरीवाल्यांना देण्यात आलेला पास आदी कागदपत्रे संबंधित फेरीवाल्यांनी सर्वेक्षणावेळी स्वतःजवळ बाळगणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती फेरीवाल्यांनी सोबत ठेवाव्यात.



### बायोमेट्रिक पद्धतीने विनामूल्य सर्वेक्षण...

**महापालिकेच्यावतीने पिंपरी चिंचवड शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण दि.१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत करण्यात येणार आहे. हे सर्वेक्षण विनामूल्य तसेच बायोमेट्रिक पद्धतीने होणार असून नोंदणी व सर्वेक्षण सुलभ पद्धतीने होण्यासाठी शहरातील संबंधित फेरीवाल्यांनी आपल्या मोबाईल क्रमांकास आधारकार्ड लिंक (संलग्न) करून या सर्वेक्षणात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे. फेरीवाला सर्वेक्षणासाठी संबधित फेरीवाल्यांकडे आधारकार्डची छायांकित प्रत, रेशन कार्डचे पहिले पान व शेवटचे पान यांची एका पानावरील छायांकित असणे अनिवार्य आहे. जातप्रमाणपत्राची छायांकित प्रत स्वतःजवळ असावी. दिव्यांग, घटस्फोटीता, परितक्ता महिलांसाठी अनुषंगिक पुराव्याची प्रत असणे गरजेचे आहे.**


# राज्यात गारठा वाढला, पुण्यात सर्वात कमी तापमानाची नोंद

## राज्यातील हवामान कोरडे राहण्याची शक्यता - हवामान खाते

**| पिंपरी |**

**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

दिवाळीनंतर राज्यात गारवा चांगलाच जाणवत असून, हुडहुडी वाढली आहे. तर दुपारी गरमी अशी काहीशी स्थिती आहे. राज्यात सर्वात कमी किमान तापमानाची नोंद पुण्यात झाली आहे. पुण्यात 12.6 अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं आहे. मंगळवारी राज्यात हवामान कोरडे राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला. यापुढील दिवसांत राज्यातील हवामान कोरडे राहण्याची शक्यताही हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. राज्यात गारठा वाढू लागला आहे. राज्यात बहुतांश ठिकाणी किमान तापमान 18 अंशांखाली आल्याने पहाटे गारठा वाढू लागला आहे. कमाल तापमानात चढ-उतार सुरू असून, दुपारी उन्हाचा चटका कायम आहे. राज्याच्या कमाल आणि किमान तापमानात चढ-उतार सुरू आहे. यापुढे राज्यात हवामान आणखी थंड राहील असेही हवामान विभागाकडून सांगण्यात आले. उत्तरेकडून येणाऱ्या थंड व कोरड्या वाऱ्यांमुळे राज्यात थंडी वाढत आहे. राज्यातल्या अनेक भागांमध्ये सध्या थंडी वाढल्याचे चित्र आहे. सर्वात कमी किमान तापमानाशी नोंद पुण्यात करण्यात आली आहे. पुण्यात 12.6 अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले. आहे. IMD च्या माहितीनुसार, येत्या आठवड्यात पुणे आणि लगतच्या भागात अशीच थंडी कायम राहणार आहे. गेल्या पाच दिवसांपासून पुण्यात तापमानात मोठी घट झाली आहे.



### राज्यात थंडी वाढण्याची शक्यता

**पुण्यात 24 तारखेला 14.4 अंश सेल्सिअस, 25 ला 13.8 अंश सेल्सिअस, तर 26 आणि 27 तारखेला 14.3, 28 ला 13.8 अंश सेल्सिअस, 29 ऑक्टोबरला 13.3 अंश सेल्सिअ तर सोमवारी 1 तारखेला तब्बल 12.6 अंश सेल्सिअसपर्यंत हे तापमान खाली आहे. सरासरीच्या तुलनेमध्ये तापमानात घट झाल्याने थंडी वाढली असून हवामान विभागांना दिलेल्या माहितीनुसार राजस्थानमधून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे आणि हिमालयीन पर्वतरांगांवर होत असलेल्या बर्फदृष्टीमुळे राज्यात थंडी वाढण्याची शक्यता आहे.**

### कोठे कसे तापमान?

| | |
|---|---|
| पुणे – 12.6 | सांताक्रूझ – 20.5 |
| लोहगाव – 14.7 | रत्नागिरी – 22.2 |
| जळगाव – 14 | पणजी – 22.8 |
| कोल्हापूर – 17.7 | डहाणू – 20.3 |
| महाबळेश्वर – 13.8 | उस्मानाबाद – 15.2 |
| नाशिक – 13.3 | औरंगाबाद – 13 |
| सांगली – 17.2 | परभणी – 15.4 |
| सातारा – 14.3 | नांदेड – 16.4 |
| सोलापूर – 16.1 | अकोला – 17.8 |
| मुंबई – 24 | गोंदिया – 17 |

# साखर निर्यात बंदीचा धसका!

## राज्यातील कारखानदार, राज्य सरकारच्या मागणीला केराची टोपली

।पिंपरी।

। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**साखर निर्यातीत विक्रमी वाटा असलेल्या महाराष्ट्रातील साखर उद्योगाकडून केंद्र सरकारकडे सातत्याने खुल्या साखर निर्यात धोरणासाठी आग्रह धरला जात होता. राज्य सरकारकडूनही अशीच मागणी करण्यात आली होती. मात्र, या मागण्यांना केराची टोपली दाखवित केंद्राकडून ऑक्टोबर २०२३ पर्यंत साखर निर्यातीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. हे निर्बंध राज्यातील साखर उद्योगाच्या मुळावर उठणार असल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.**



**साखर निर्यातीवर सध्या घातलेले निर्बंध जीवनावश्यक घटक म्हणून घातले गेले आहेत. यामुळे खुली निर्यात होऊ शकणार नाही. केंद्र सरकार दोन दिवसांत साखर निर्यातीबाबतचे आपले धोरण जाहीर करेल. ठरावीक कोटा ठरवून देऊन निर्यातीला परवानगी द्यावी. कारखानानिहाय कोटा ठरवून निर्यातीला परवनगी देण्याचे धोरण जाहीर केल्यास ते अडचणीचे ठरणार आहे.**

**- बी. बी. ठोंबरे, अध्यक्ष, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (विस्मा)**

जीवनावश्यक वस्तूंमध्ये साखरेचा समावेश असल्यामुळे देशांतर्गत बाजारात साखर मुबलक प्रमाणात उपलब्ध रहावी. महागाई वाढू नये म्हणून केंद्र सरकारने हे निर्बंध घातल्याचे सांगितले जात आहे. मात्र, हे निर्बंध साखर उद्योगाच्या मुळावर उठणार आहेत. देशात २०२२-२३ च्या गळीत हंगामात सुमारे ३६० लाख टन साखर उत्पादित होईल, असा अंदाज इंडियन शुगर मिल्स असोशिएशनने (इस्मा) व्यक्त केला आहे. देशाला एका वर्षासाठी सुमारे २८० लाख टन साखरेची गरज असते.

त्यामुळे अतिरिक्त साखरेच्या खुल्या निर्यातीला परवानगी द्यावी, अशी मागणी साखर उद्योगातून करण्यात येत होती.

त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना यंदा एफआरपीची रक्कम वेळेत मिळाली होती. निर्बंधांमुळे केंद्राच्या पूर्व परवानगीशिवाय साखर निर्यात करता येणार नाही, कारखानानिहाय कोटा ठरवून दिल्यास साखर निर्यातीत घट होण्याचा धोका आहे.

### राज्याला मोठा फटका

मागील गळीत हंगामात देशातून सुमारे ११० लाख टन साखरेची निर्यात झाली आहे. त्यापैकी तब्बल साठ टक्के म्हणजे सुमारे ७० लाख टन साखर राज्यातून निर्यात झाली आहे. दरात तेजी आणि साखरेचे पैसे तत्काळ मिळत असल्यामुळे विक्रमी निर्यात झाली होती. तत्काळ पैसे हाती आल्यामुळे कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारली होती.

### केंद्राचा निर्णय मूर्खपणाचा : राजू शेट्टी



साखर निर्यातीवर निर्बंध घालण्याचा केंद्र सरकारचा निर्णय मूर्खपणाचा आहे. भविष्यात आंतरराष्ट्रीय बाजारात दर वाढतील, त्याचा फायदा कारखान्यांना व्हावा, यासाठी हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. पण, या निर्बंधामुळे देशांतर्गत बाजारात साखरेच्या दरात घसरण होऊ शकते. ब्राझीलने साखर उत्पादन वाढविल्यास आंतराष्ट्रीय बाजारात दर पडू शकतात.

त्यामुळे हा निर्णय पूर्णपणे अव्यवहार्य आहे. सरकारने मार्चअखेरपर्यंत किमान ५० लाख टन इतक्या साखरेच्या खुल्या निर्यातीला परवानगी देण्याची गरज होती. केंद्राच्या धोरणांमुळे चांगल्या चाललेल्या साखर उद्योगाला अडचणींचा सामना करावा लागणार आहे,

---

# दिवाळीत भुसार बाजार तेजीत

## ३५० कोटी रुपयांची उलढाल

। पुणे। महाईन्यूज ।

गेली दोन वर्षे करोना संसर्ग असल्याने दिवाळीचा सण बेताने साजरा करण्यात आला होता. यंदाच्या वर्षी दिवाळीत मार्केट यार्डातील भुसार बाजारात ३५० कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. गेल्या वर्षी दिवाळीत भुसार बाजारात २२८ कोटी रुपयांची उलढाल झाली होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा भुसार बाजारातील उलाढालीत १२२ कोटी रुपयांनी वाढ झाली आहे.

करोनाचे सावट दूर झाल्यानंतर भुसार बाजारात उलाढाल वाढल्याने यंदा दिवाळीची बाजार समितीसह व्यापाऱ्यांसाठी आनंददायी ठरली आहे. करोना संसर्गामुळे गेले दोन वर्ष दिवाळीतील उलाढालीवर परिणाम झाला होता. बाजारात खरेदीचा फारसा उत्साह जाणवला नव्हता. यंदा दिवाळीत भुसार बाजारात मोठी उलाढाल झाली. बाजार समितीच्या भुसार विभागात ३५० कोटी रुपयांची उलाढाल झाली. गेल्या दिवाळीच्या तुलनेत यंदा भुसार बाजारातील



### कृषी उत्पन्न बाजार समिती

**दिवाळीत आटा, रवा, मैदा, बेसन, पोहे, विविध प्रकारचे मसाले, तेल, तूप, साखरेला मागणी होती. मिठाईऐवजी सुकामेवा भेट देण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. सुकामेव्याची विक्री मोठ्या प्रमाणावर झाली. यंदा भुसार बाजारात खरेदीसाठी उत्साह होता.**

**- राजेंद्र बाठिया, अध्यक्ष, दी पूना मर्चंट्स चेंबर**

उलाढालीत १२२ कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. गेल्या काही वर्षांपासून अन्नधान्य ऑनलाइन खरेदीचे प्रमाण वाढले असले, तरी प्रत्यक्ष बाजारात जाऊन खरेदी करण्याचे प्रमाणही मोठे आहे. मार्केट यार्डातील भुसार विभागात पुणे शहर, उपनगर तसेच जिल्ह्यातील खरेदीदारांची दिवाळीत खरेदीसाठी मोठी गर्दी झाली होती. भुसार बाजारातून मागणी वाढल्याने अन्नधान्याची आवक मोठ्या प्रमाणावर झाली.

# पुरंदर विमानतळाबाबत आठ दिवसांत उच्चाधिकार समितीची बैठक

।पिंपरी । महाईन्यूज ।

पुण्याचे हक्काचे पुरंदर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाबाबत उच्चाधिकार समितीची बैठक येत्या आठ दिवसांत होणार आहे. त्यामध्ये भूसंपादन, भूसंपादन अधिसूचना, प्रकल्पग्रस्तांना द्यावयाच्या मोबदल्याचे पर्याय, विमानतळासोबत करण्यात येणारे बहुउद्देशीय माल वाहतूक व साठवणूक केंद्र (मल्टिमॅाडेल लॉजिस्टिक हब) यांबाबत चर्चा करण्यात येणार आहे. त्यामुळे या बैठकीनंतर काही दिवसांनी भूसंपादन अधिसूचना निघण्याची शक्यता आहे. पुरंदर येथील नियोजित विमानतळ प्रकल्प जुन्या जागेतच करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी बैठक घेऊन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी – एमएडीसी) आणि जिल्हा प्रशासनाला प्रकल्पाबाबत आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (महाराष्ट्र इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट



कॉर्पोरेशन – एमआयडीसी) देण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार दोन्ही यंत्रणांनी संबंधित अहवाल एमआयडीसीकडे सुपूर्द केला आहे. प्रकल्पाचे भूसंपादन एमआयडीसीच्या भूसंपादन कायद्यानुसार करण्यात येणार असल्याने एमआयडीसीने भूसंपादन अधिसूचना काढल्यानंतरच जिल्हा प्रशासनाकडून पुढील कार्यवाही केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर उच्च अधिकार समितीच्या बैठकीकडे लक्ष लागून राहिले आहे.

याबाबत बोलताना विभागीय आयुक्त सौरभ राव म्हणाले, 'दिवाळीनंतरच्या आठ दिवसांत उच्च अधिकार समितीची बैठक बोलाविण्यात आली आहे. या समितीकडून प्रकल्पाला प्राथमिक परवानगी मिळणे आवश्यक आहे. ही परवानगी मिळाल्यानंतरच प्रकल्पाबाबतच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करता येणार आहे. त्यामुळे ही बैठक महत्त्वाची आहे. या बैठकीत होणाऱ्या निर्णयांनुसार पुढील कार्यवाही केली जाईल.'

### लॉजिस्टिक उद्योगातील सर्वात मोठा वेतनवाढ करार

# 'महिंद्रा लॉजिस्टिक'च्या कर्मचाऱ्यांना 12 हजार 800 रुपयांची पगारवाढ!

## स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटनेमुळे कामगारांना न्याय





**कामगारांना मिळालेले लाभ पुढीलप्रमाणे**

**कामगारांना मिळवून दिलेल्या सर्व सुविधांच्या व्यतिरिक्त**

**१) एकूण पगारवाढ :- १२८००/- ( बारा हजार आठशे रुपये)**

**२) कराराचा कालावधी ०१/०९/२०२२ ते २८/०२/२०२६ या साडेतीन वर्षांचा राहील.**

**३) मागील सर्व फरक कामगारांना देण्याचे मान्य केले आहे.**

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

महिंद्रा लॉजिस्टिक लि. मधील कामगारांना तब्बल १२ हजार ८०० रुपयांची पगारवाढ मिळाली आहे. चाकण औद्योगिक पट्टयात लॉजिस्टिक उद्योग क्षेत्रातील आतापर्यंतची सर्वाधिक पगार वाढ असून, ऐन दिवाळीत कामगारांना 'विंटर गिफ्ट' मिळाले आहे. चाकण औद्योगिक वसाहतीमधील निघोजे येथील महिंद्रा लॉजिस्टिक लि. व स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना यांच्यामध्ये झालेल्या दुसऱ्या वेतनवाढ करारावर संघटनेचे प्रमुख सल्लागार आमदार महेश लांडगे, रोहिदास गाडे, महिंद्रा कंपनीचे उपाध्यक्ष विजय नायर, उद्योजक संतोष शिंदे, अध्यक्ष जीवन येळवंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षरी कार्यक्रम झाला. आमदार लांडगे यांनी कंपनी व्यवस्थापन आणि कामगार संघटना यांच्यात योग्य मध्यस्थी कामगारांना न्याय दिला आहे. यावेळी संघटनेचे सल्लागार किसन बावकर, सरचिटणीस कृष्णा रोहोकले, चिटणीस रघुनाथ मोरे, उपाध्यक्ष शामभाऊ सुळके, खजिनदार अमृत चौधरी, संघटक तेजस बिरदवडे, दत्तात्रय गवारे, भट्टू पाटील, युनिट अध्यक्ष प्रशांत पाडेकर, व्यवस्थापनाच्या वतीने महिंद्रा कंपनीचे व्हाइस प्रेसिडेंट प्रसन्ना पहाडे, एडविन लोबो, व्हाइस प्रेसिडेंट एच.आर. हेड प्रदीप झोटिंग, जोगिंदर सिंग, सुनील धानोरकर, श्रेयस आचार्य, शेखर करंजीकर, जनरल मॅनेजर ऑपरेशन हेड मुकेश कपूर, जनरल मॅनेजर एच.आर सतीश परब, डेप्युटी जनरल मॅनेजर एच.आर धीरज सिंह यांनी करारावर स्वाक्षरी केल्या आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदीप झोटिंग यांनी केले, व सूत्रसंचालन पुजा थिगळे यांनी केले. सरचिटणीस कृष्णा रोहोकले यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि धीरज सिंह यांनी कार्यक्रमाचा समारोप केला. कामगारांनी डिजेच्या तालावर नाचून, पेढे वाटून फटाक्याची अतिषबाजी करुण आनंद व्यक्त केला.

---

### पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या जनसंवाद सभेत सर्वाधिक तक्रारी पाणीपुरवठ्याबाबत...

# अपुऱ्या पाणीपुरवठ्याबाबत तक्रारींचा पाऊस!

### जनसंवाद सभेत 47 नागरिकांनी सहभाग नोंदवत तक्रारवजा सूचना मांडल्या

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या जनसंवाद सभेत शहरातील अपु-या पाणीपुरवठ्याबाबतचा तक्रारींचा पाऊस पडत आहे. सर्वाधिक तक्रारी पाणीपुरवठ्याबाबत येत आहेत. शहरातील विविध भागातील पाणीपुरवठा विस्कळीत असून पाणीपुरवठा पुरेशा दाबाने करण्याची मागणी नागरिकांनी (सोमवारी) झालेल्या जनसंवाद सभेतही प्रशासनाकडे केल्या.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने नागरिकांच्या आशा आणि आकांक्षांचे प्रतिबिंब महापालिकेच्या ध्येय धोरणे, विविध निर्णयात दिसावे. शहरातील नागरिक आणि प्रशासन यांच्यामध्ये सुसंवाद राखण्यासाठी, तक्रारींचे निवारण जलदगतीने करण्यासाठी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज जनसंवाद सभा पार पडली. जनसंवाद सभेत 47 नागरिकांनी सहभाग घेऊन तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये अनुक्रमे 9, 9, 1, 3, 3, 5, 9 आणि 8 इतक्या नागरिकांनी उपस्थित राहून आपले म्हणणे मांडले.

अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह, या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता श्रीकांत सवणे, पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, समाज विकास विभागाचे उप आयुक्त चंद्रकांत इंदलकर, आरोग्य विभागाचे उप आयुक्त अजय चारठाणकर, भूमी जिंदगी विभागाचे सहायक आयुक्त प्रशांत जोशी यांनी भूषवले. तसेच क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी, सुचिता पानसरे, सोनम देशमुख, अण्णा बोदडे, उमाकांत गायकवाड, सीताराम बहुरे, शीतल वाकडे, विजयकुमार थोरात हे उपस्थित होते. क्षेत्रीय कार्यालयातील जनसंवाद सभेत स्थापत्य, जलनिस्सारण, पाणीपुरवठा, विद्युत, नगररचना विभागांचे कार्यकारी अभियंता, उद्यान, वैद्यकीय, आरोग्य, करसंकलन या विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

आज झालेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. रस्त्याच्या कडेला, पदपथांवर उभारण्यात आलेले अतिक्रमण काढावेत, त्याठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी, विद्युत खांबांवर, उद्यानांमध्ये अनधिकृतपणे लावण्यात आलेले फ्लेक्स तातडीने काढण्यात

---

# पिंपरी-चिंचवडकरांनी दिवाळीत केली 50 कोटींची सोने खरेदी

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



पिंपरी-चिंचवडकरांनी दिवाळी सणानिमित्त सोने खरेदीवर भर दिल्याचे दिसून येत असून 50 कोटी रुपयांचे सोने खरेदीची उलाढाल झाली आहे. दसऱ्याला देखील सराफा बाजारात सुमारे 40 कोटी रुपयांची उलाढाल झाली होती. दसऱ्या पाठोपाठ सराफी बाजारात दिवाळीत शहरवासीयांनी जोरदार सोने खरेदी केली आहे. त्यामुळे शहरातील सराफी बाजारपेठेत तब्बल 50 कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. कोरोनाच्या दोन वर्षानंतर राज्य सरकारने सर्वच सणांवरील निर्बंध उठविले आहेत. त्यामुळे दिवाळी सणांला शहर आणि परिसरातील बाजारपेठेत नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. तसेच मनसोक्त खरेदी केली आहे. ऐन दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सोन्याच्या दरात चांगलीच घसरण झाली होती. त्यामुळे नागरिकांनी दिवाळी सणाचा मुहूर्त साधत सोने खरेदीला पसंती दिली.

सोन्याचे 24 कॅरेटचे भाव 50 हजार रुपये होते. तर चांदी 55 हजार 555 रूपयांवर आली होती. सोन्याची खरेदी करण्यासाठी सोने-चांदी दुकानात दिवाळीच्या चारही दिवस नागरिकांची मोठी गर्दी होती. अनेक प्रकारचे दागिन्यांची खरेदी करण्यात आली. याशिवाय चांदी, हिरेयुक्त दागिन्यांची खरेदी झाली. शहरात 400 सराफी पेढी आहेत. या सर्व दुकानांमधून 50 कोटींपेक्षा अधिक उलाढाल झाल्याचे पिंपरी-चिंचवड ज्वेलर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष दिलीप सोनिगरा यांनी सांगितले.

## संपादकीय

# उभारी धरावी कोणी?

***अलीकडच्या काही दशकात शेतकरी इतका खचलेला की बदल करण्याची हिंमतच त्याच्याजवळ शिल्लक उरलेली नाही.***

विदर्भाच्या एकूण अर्थव्यवस्थेतील साठ टक्के वाटा ज्या क्षेत्रातून येतो, त्या कृषीची अवस्था यंदा भीषण आहे. ऐन दिवाळीच्या पर्वात सारा शहरी वर्ग आनंदाने न्हाऊन निघत असताना ग्रामीण भागात पसरलेला सन्नाटा अंगावर काटा उभा करणारा आहे. करोनाच्या दाहक काळात ज्या शेतीने तारले, या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेला धुगधुगी दिली ती शेतीच यंदा पार भूईसपाट झालेली दिसते. गडचिरोलीपासून बुलढाण्यापर्यंतच्या कोणत्याही शिवारात जा. कुठे करपलेली तर कुठे झोपलेली पिके व डोक्यावर हात ठेऊन बसलेला शेतकरी हे दृश्य सार्वत्रिक आहे. दुर्दैव हे की या दुरवस्थेच्या योग्य चित्रणापासून माध्यमे अद्याप दूर आहेत. करोनानंतर अगदी उत्साहात साजरी झालेली यंदाची पहिलीच दिवाळी याच घोषात ती मशगुल दिसतात. कारण एकच. केवळ विदर्भच नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठा वाटा असलेले कृषी क्षेत्र अजूनही माध्यमस्नेही झालेले नाही. पण माध्यमांनी पाठ फिरवली म्हणून वस्तुस्थिती दडवता येते असे नाही. शेतीच्या या दुरवस्थेचे दाहक परिणाम येणाऱ्या काळात साऱ्यांनाच भोगावे लागणार आहेत हे निश्चित. प्रामुख्याने कोरडवाहू शेतीवर भर असलेल्या वैदर्भिय शेतकऱ्यांची सारी भिस्त खरीप हंगामावर. यंदा पावसाने त्यावरच अक्षरश: पाणी ओतले. याचा फटका कापूस, सोयाबीन व तूर या हंगामातील प्रमुख पिकांना बसला. प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरातली वर्षभराच्या गुजराणीची बेगमी याच पिकांवर ठरत असते. एकदा का ती हातात आली की शेतकरी नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज होत असतो. यंदा पावसाळय़ाच्या आरंभापासून सप्टेंबरपर्यंत पाऊस सलग कोसळत राहिला तेव्हाही पिके हातची जातील याची भीती शेतकरी वर्गाला होतीच. तरीही एकरी आठ ते नऊ क्विंटल सोयाबीन निघेल, कापसाचा हंगाम थोडा उशिरा सुरू होईल व डिसेंबरपर्यंत वेचणीला सवड मिळेल ही आशा प्रत्येकाच्या मनात होती. मात्र, या महिन्यात आणखी धो धो कोसळलेल्या परतीच्या पावसाने साऱ्यांची आशा धुळीस मिळवली. तो इतका कोसळला की सोयाबीनच्या झाडावरच नव्याने कोंब अवतरले. कापसाचे बोंड काळे ठिक्कर पडले. शेतीतल्या या चित्राकडे मध्यमवर्ग डोळे फिरवत असला तरी व्यापाऱ्यांचे तसे नाही. धंदा हेच मुख्य उद्दिष्ट असलेल्या या वर्गाने बाजारात माल येण्याआधीच भाव पाडायला सुरुवात केली. आताच्या घडीला सोयाबीन व कापूस या दोन्ही नगदी पिकांना पाच ते सहा हजाराच्या पलीकडे भाव नाही. म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेत निम्मा. यंदा पावसाने केवळ विदर्भातच कहर केला असे नाही.



## आनंदी सकाळ

### रघुनायकेविण काज आणिक नाही।'

वारकरी संप्रदायात अठरापगड जातींत संत निर्माण झाले; तसेच समर्थ संप्रदायातही एकापेक्षा एक श्रेष्ठ असे महंत निर्माण झाले. महंतांनी धर्मकारणाबरोबरच समाजकारण व प्रसंगी राजकारणही केले. महंतांचा आध्यात्मिक अधिकारही संतपरंपरेला शोभणारा होता. पट्टाभिषिक्त रामरायाचे वैभवही समर्थांनी खूप वाढवले. 'रघुनायकेविण काज आणिक नाही।' हाच भाव त्यांच्या वृत्तीत वसत होता. त्यासाठी रामदासी हा बलाने व बुद्धीने सतेज असावा, असी समर्थांची धारणा होती. महंतांसी शत्रुत्व घेताना समोरच्याला दहावेळा विचार करावा लागेल, असे सामर्थ्य आणि जरब महंतांच्या ठिकाणी असे. कल्याणस्वामी, उद्धव गोसावी यांसारख्या रामदासींनी तर असामान्य कर्तृत्व जागवले. कल्याणस्वामींनी योगमार्ग, तत्त्वज्ञान; तसेच गुरुसेवा यांत अनन्यसाधारण अधिकार प्राप्त केला. उद्धव गोसावींनी सारंगपूर येथून सातशे दीक्षित रामदासी भक्तांची पलटण उभी करून, ती महाराष्ट्रात आणली.

# विषमतेवर घाला कसा घालणार?



## भूमिका



महाराष्ट्राची लोकसंख्या १३ कोटी आहे. भौगोलिक क्षेत्र व लोकसंख्या याबाबत भारताशी तुलना करता महाराष्ट्राचे प्रमाण अनुक्रमे ९.४ व ९.३ टक्के आहे. तथापि, महाराष्ट्राचे उत्पन्न देशाच्या १५ टक्के असून २०२१-२०२२ साली सांकेतिक किमतीनुसार ते ३२ लाख कोटी रुपये होते. यापैकी राज्य सरकारला कर व करबाह्य महसूल तीन लाख ६२ हजार कोटी एवढा मिळाला. २०२२-२०२३ या वित्तवर्षात तो १२ टक्क्यांनी वाढून ३६ लाख कोटी रुपये होईल. राज्य सरकारची महसुली जमा असेल ४ लाख कोटी रुपये. ऑक्सफॅम, अन्य संस्था व संशोधकांच्या ताज्या आकडेवारीनुसार ९० टक्के भारतीयांचा उत्पन्न व संपत्तीतील हिस्सा उत्तरोत्तर कमी होत असून सर्वोच्च १० टक्क्यांचा उत्पन्नातील हिस्सा ५६ टक्के तर संपत्तीतील हिस्सा ७४ टक्के आहे. याउलट तळच्या ५० टक्के लोकसंख्येचा हिस्सा अनुक्रमे १४ टक्के व २.५ टक्के आहे. महाराष्ट्रात ही विषमता अधिक उग्र आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील अकरा कोटी लोक दैन्यावस्थेत आहेत. कोण आहेत आहेत हे? प्रत्यक्ष शेतीत घाम गाळणारे शेतकरी, शेतमजूर, कोळी, कारागीर, घरकाम, बांधकाम करणारे मजूर, स्वंय-रोजगारीत काबाडकष्ट करून जगणारे, हातावर पोट असणारे सामान्य लोक. म्हणजेच बहुसंख्य मतदार जे आमदारांना निवडून देतात. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन यंदाचा ४ लाख कोटी रुपयांचा बजेट खर्च कशासाठी, कोणासाठी होणार, असा प्रश्न केला पाहिजे. एकंदरीत राज्य सरकार यंदा पाच लाख कोटी रुपये खर्च करणार आहे. यातील ८० टक्के खर्च पगार, निवृत्तिवेतन, व्याज, मूळ कर्जाची परतफेड, अनुदाने, अर्थसाह्य यावर केला जाईल. थोडक्यात, सरकारी लवाजमा व आस्थापना पोसण्यासाठी हा खर्च होणार. याखेरीज सिंचन, वीज, महामार्ग, समृद्धी मार्ग, मेट्रो व अन्य बांधकामे व त्याची कंत्राटे व कमिशन यावरच हा तथाकथित भांडवली खर्च होईल. म्हणजे वरची १० ते १५ टक्के उच्च पगारवाले, कंत्राटदारांचा नि व्यावसायिकांचा जो कळप आहे त्यासाठीच हा सरकारी खर्च होतो. अप्रिय वाटले तरी हेच वास्तव आहे. समता, न्याय, बंधुभाव हा घटनेचा पाया असला तरी आर्थिक विषमता, सामाजिक विसंवाद व पर्यावरणीय विद्ध्वंस वेगाने वाढत असल्यामुळे श्रमजीवी जनसमूहांचा जीवनकलह उग्र होत असून करोना व हवामान बदलांमुळे तो शिगेला पोहोचला आहे निम्या लोकसंख्येचा दरमहा दरडोई खर्च पाच हजार रुपयांपेक्षा कमी आहे. ९० टक्के लोकसंख्येचे दरडोई दरमहा उत्पन्न २५ हजार रुपयांपेक्षा कमी आहे. याउलट देशातील केवळ ९८ श्रीमंत अब्जाधीशांकडे ५५ कोटी लोकांच्या एकूण संपत्तीपेक्षा अधिक संपत्ती आहे. यापैकी सर्वांत जास्त अब्जाधीश महाराष्ट्रात आहेत

# पाणी पळवलंय..

### फॉक्सकॉन, एअरबस हे उद्योग गुजरातला गेल्याची चर्चा जितकी तावातावाने होते, तितकी तापी खोऱ्याचे पाणी गुजरातने गिळंकृत केल्याबद्दल का होत नाही?



केंद्रीय अर्थसंकल्पाचे पाठबळ आता 'तापी-दमणगंगा प्रकल्पा'ला आहेच, पण खान्देश विकसित व्हावा म्हणून केंद्रापुढे खंबीर भूमिका महाराष्ट्रातील नेतृत्वाने कधी घेतली आहे? फॉक्सकॉन-वेदांत कंपनीचा सुमारे २२ अब्ज डॉलर्सचा सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्प महाराष्ट्रातून गुजरातमध्ये स्थलांतरित होत असल्याची बातमी विरते न विरते तोच आता 'टाटा- एअरबस' हा दुसरा मोठा प्रकल्पही त्याच राज्यात चालल्याचा वाद सुरू झाला आहे. यापूर्वीही काही महत्त्वाच्या संस्था आणि उद्योग राज्यातून गुजरातमध्ये गेल्यामुळे आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या आहेत. राज्याची प्रतिष्ठा आणि अस्मिता या उद्योग स्थलांतराशी(च) निगडित असल्याचे अधोरेखित करण्यात येत आल्यामुळे स्वाभाविकच जनमताचा रेटादेखील निर्माण झालेला दिसतो. यानिमित्ताने व्यक्त होणारी तीव्र प्रतिक्रिया आणि प्रक्षोभ स्वाभाविकच आहे. तथापि महाराष्ट्राच्या हक्काचे पाणी गुजरातच्या घशात घातले जात असताना असा विरोध आणि नाराजी व्यक्त होताना कधी आढळत नाही. या उदासीनतेमुळे आणि गांभीर्याच्या अभावामुळेच गेल्या साठ-पासष्ट वर्षांत वेळोवेळी झालेले महाराष्ट्राच्या दृष्टीने अनुकूल असलेले जल लवादांचे निवाडे तसेच शिफारशी धाब्यावर बसवून गुजरात निर्धोकपणे पाणी पळविण्याचे धाडस करतो आहे. विशेष म्हणजे याच पाण्याचा अत्यंत काटेकोर आणि नियोजनबद्ध वापर करून पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती आणि त्यातून विकासाचे इमले गुजरातमध्ये रचले जाताहेत. प्रचंड गुंतवणूक असलेले उद्योग खेचून आणण्याची क्षमता गुजरातने निर्माण केलेली आहे, यामागे पाणी या संसाधनाची विपुलता हे मुख्य कारण आहे. हे महाराष्ट्राच्या हक्काचे हडप केलेले पाणी आहे, हे महत्त्वाचे. उद्योगांची पळवापळवी हा तसा गुजरातचा अलीकडच्या काळातील उद्योग म्हणावा लागेल. तथापि महाराष्ट्राच्या हिश्शाचे तापी नदी खोऱ्यातील पाणी गिळंकृत करण्याचा परिपाठ मात्र पूर्वीपासून अखंड सुरू आहे. मध्य प्रदेशात उगम पावणारी पश्चिमवाहिनी असलेली तापी नदी महाराष्ट्रातून प्रवास करत गुजरातमध्ये सुरतजवळ अरबी समुद्राला मिळते. केवळ याच भौगोलिक रचनेचा लाभ घेत गुजरात तापीमधील एकूण उपलब्ध पाण्यापैकी स्वत:च्या हिश्शाच्या पाण्याचा थेंब अन् थेंब वापरतोच, शिवाय महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाच्या हिश्शाच्या सुमारे ८० टक्के पाण्यावर डल्ला मारण्याचा उद्योगही सुरू आहे. 'लहान भाऊ' म्हणवणाऱ्या गुजरातची उद्योग आणि पाणी पळवण्याच्या क्षेत्रातील दबंगगिरी

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बल्क ड्रग पार्क विरोधात शेतकऱ्यांचा मोर्चा!

## बल्क ड्रग पार्क विरोधात शेतकऱ्यांनी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला

।अलिबाग ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

प्रकल्प राज्याबाहेर जाण्यावरून राजकारण तापले असतांनाच मुरुड आणि रोहा तालुक्यातील प्रस्तावित बल्क ड्रग पार्क विरोधात शेतकऱ्यांनी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पासाठी जागा देणार नसल्याचा निर्धार त्यांनी यावेळी बोलून दाखवला. सकाळी सव्वा दहाच्या सुमारास चितामणराव केळकर विद्यालयापासून मोर्चाला सुरवात झाली. सुमारे दोन हजार शेतकरी या मोर्चात सहभागी झाले. शेतकरीभवन, बालाजी नाका, मारुती नाका मार्गे मोर्चा जनरल अरुणकुमार वैद्य विद्यालयासमोर दाखल झाला. या




ठिकाणी पोलीसांनी मोर्चा अडवला. मोर्चाचे छोटेखानी सभेत रुपांतर करण्यात आले. प्रकल्प विरोधी शेतकरी समितीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी यावेळी मोर्चाला संबोधीत केले. यानंतर भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष महेश मोहीते यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन दिले.

या प्रकल्पाला शेतकऱ्यांनी सुरवातीपासूनच विरोध केला आहे. शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनींबरोबरच राहती घरेही, वाड्या वस्त्याही संपादीत केल्या जाणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना बेरोजगारी बरोबरच बेघर होण्याची वेळ येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा या प्रकल्पाला विरोध असल्याचे अँड. महेश मोहीते यांनी सांगितले. त्याच बरोबर जिल्ह्यात यापुर्वीही एमआयडीसीच्या मार्फत अनेक ठिकाणी भुसंपदान करण्यात आले आहे. पण त्याठिकाणी प्रकल्प आलेले नाहीत. शेती गेली आणि प्रकल्प आले नाही, रोजगार मिळाले नाहीत आणि लोक देशोधडीला लागले त्यामुळे या कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पासाठी जागा देणार नसल्याचा निर्धार यावेळी शेतकऱ्यांनी बोलून दाखवला.

रोहा तालुक्यातील भुसंपादन क्षेत्रात बड्यानेत्यांनी जागा जमिनी खरेदी करून त्यामध्ये गुंतवणूक केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा विरोध असूनही प्रकल्प पुढे रेटला जात असल्याचा दावा महेश मोहीते यांनी केला. प्रकल्प परीसरात कोणी किती जागांची खरेदी केली आहे. याची यादी माझ्याकडे आहे. लवकरच ती नावे जाहीर करणार असल्याचेही यावेळी सांगीतले. या प्रकल्प विरोधी आंदोलनाचे मी सुरवातीपासून नेतृत्व केले आहे. शेतकऱ्यांची बाजू मांडण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांची वेळोवेळी भेट घेतली आहे. त्यामुळे सत्ता बदल झाला म्हणून आता भुमिका बदलणे योग्य ठरणार नाही. मी कालही शेतकऱ्यांसोबत होतो उद्याही राहीन, पदाचा राजीनामा दिला आहे. वेळ पडली तर पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देण्याची माझी तयारी आहे. पण शेतकऱ्यांची साथ सोडणार नाही अशी जाहीर भुमिका मोहीते यांनी यावेळी मांडली.

# राज्य सरकार सर्व प्रकल्पांची श्वेतपत्रिका काढणार

## उद्योगमंत्री उदय सामंतांची घोषणा

।मुंबई । महाईन्यूज ।

महाराष्ट्रातील मोठे प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. यावेळी राज्य सरकार सर्व प्रकल्पांची श्वेत पत्रिका काढणार असल्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेतून केली.

वेदांता-फॉक्सकॉन, टाटा एअरबस, सॅफ्रन, सिनारमस या प्रकल्पांची खरी वस्तूस्थिती महाराष्ट्रासमोर आणण्यासाठी आम्ही येत्या महिन्याभरात या सर्व प्रकल्पांची श्वेतपत्रिका जाहीर



करणार आहोत. यामध्ये महाराष्ट्र शासनानं उद्योगांबाबत केलेला पत्रव्यवहार, दाओसमधील झालेल्या बैठका असतील. तसेच या बैठका झाल्यानंतर या रेकॉर्डचा पुरावा MIDC आणि उद्योग विभागाकडे किती आहे, याचा पुरावा आम्ही महाराष्ट्राला आणि युवा पिढीला देणार आहोत, असं उदय सामंत म्हणाले.

काल सॅफ्रन प्रोजेक्टबाबत महाराष्ट्राच्या जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा प्रकार घडला. हा प्रयत्न काय आहे की, मीडियानं दीड दोन महिन्यापूर्वी ज्या प्रसिद्ध झालेल्या बातम्या होत्या त्या खोडण्याचं काम तसेच संबंधीत कंपनी गेल्याचं सांगून त्याचं खापर आमच्यावर फोडण्याचं काम काही लोक करत आहेत, असं उदय सामंत म्हणाले.

पूर्वी आणलेले प्रकल्प हे आम्ही आणल्याचं सांगितलं जात आहे. परंतु याबाबत मी असं कधीही वक्तव्य केलेलं नाही. उलट मी असं सांगितलं गाजावाजा करत जे MOU झाले त्यांची अमंलबजावणी का झाली नाही. कॅबिनेट सब कमिटीची मीटिंग 14 महिने का

# “पहिली वेळ असल्याने माफ करतो, पण...”

## बच्चू कडू यांचा रवी राणांना इशारा

।वाई । महाईन्यूज ।

आमदार रवी राणा आणि माजी मंत्री बच्चू कडू यांच्यात ‘खोक्यां’वरून वाद रंगला होता. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मध्यस्तीनंतर रवी राणांनी दिलगिरी व्यक्त करत बच्चू कडू यांची माफी मागितली होती. तर, बच्चू कडू यांनी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत निर्णय जाहीर करणार असल्याचं सांगितलं होतं. त्यानंतर आज ( १ नोव्हेंबर ) ‘प्रहार’च्या कार्यकर्त्यांची अमरावतीत बैठक पार पडली. यात बच्चू कडू यांनी रवी राणांना माफ केल्याचं जाहीर केलं.

“कोणीही यावं आणि काहीही म्हणावं एवढे आम्ही सोप्पं नाही. पहिली वेळ असल्याने माफ करतो. पण, यानंतर कोणीही आमच्याविरुद्ध बोललं, तर ‘प्रहार’चा वार दाखवू.



**“कोणीही यावं आणि काहीही म्हणावं एवढे आम्ही सोप्पं नाही. पहिली वेळ असल्याने माफ करतो. पण, यानंतर कोणीही आमच्याविरुद्ध बोललं, तर ‘प्रहार’चा वार दाखवू. आम्ही गांधीजींना मानतो, मात्र भगतसिंह डोक्यात आहे,” असे बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. “रवी राणांनी दिलगीरी व्यक्त केली, त्याचा आनंद आहे.**

आम्ही गांधीजींना मानतो, मात्र भगतसिंह डोक्यात आहे,” असे बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. “रवी राणांनी दिलगीरी व्यक्त केली, त्याचा आनंद आहे. अन्यथा आम्हाला उगाच अधिक हातपाय हालावावे लागले असते. पण, रवी राणांनी मोठेपणा घेत चूक लक्षात आली आणि माफी मागितली, त्याबद्दल पुन्हा आभार मानतो. आपण दोन पावले मागे घेतले, आम्ही चार पावले माघे घेऊ. विनाकारण आम्हाला उर्जा संपवायची नाही आहे,” असेही बच्चू कडू यांनी सांगितलं.

# सोलापूर रस्ते अपघातातील मृत वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्र्यांकडून ५ लाख रुपये मदत जाहीर

।मुंबई । महाईन्यूज ।

कार्तिकी वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांवर काल(सोमवार) काळाने घाला घातला. मिरज-पंढरपूर महामार्गावर जुनोनी येथे पायी दिंडीत कार घुसल्याने भीषण अपघात घडला. या अपघातात सात वारकऱ्यांचा मृत्यू झाला आहे. तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. याशिवाय ‘कार्तिकी यात्रेसाठी पंढरपूरकडे पायी निघालेल्या वारकऱ्यांना सांगोला मिरज मार्गावर वाहनाने धडक दिली. हृदय पिळवटून टाकणाऱ्या या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या वारकरी बांधवांना भावपूर्ण श्रद्धांजली. मृत वारकरी बांधवांच्या नातेवाईक आणि आप्तेष्टांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत घोषित करण्यात आली असून जखमी वारकरी बांधवांना तातडीने योग्य ते उपचार देण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.’ अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ट्वीटद्वारे दिली आहे.

मिरज-पंढरपूर महामार्गावरील सांगोल्यातील जुनोनी येथे हा अपघात झाला. अपघातातील सर्व वारकरी कोल्हापूर जिल्ह्याच्या करवीर तालुक्यातील जठारवाडी गावातील आहेत. कार्तिकी एकदशीनिमित्त ३२ वारकरी पायी पंढरपूरला जात होते, तेव्हा हा अपघात घडला.

# दिल्लीच्या नरेलामध्ये प्लास्टिक फॅक्टरीला भीषण आग!

## दोघांचा मृत्यू, अनेक गंभीर जखमी



**। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राजधानी दिल्लीतील नरेलामध्ये एका फुटवेअर फॅक्ट्रीला भीषण आगाची घटना घडली आहे. या आगीत दोघांचा होरपळून मृत्यू झाला आहे.तर अनेक कामगार गंभीर जखमी झाले आहेत. जखमी कामगारांना तात्काळ उपचारांसाठी रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. या सर्वांची प्रकृती स्थिर आहे. या आगीत मृत्यू झालेल्या कामगारांची ओळख पटवली जात आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, नरेला भागात सकाळी 9.35 वाजता एका फॅक्टरीमध्ये भीषण आगीची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या 10 गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. फॅक्टरीच्या पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर ही आग लागली, मात्र आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. जवळपास दोन तास ही आग धुमसत होती. या भीषण आगीच्या घटनेत अनेक जण होरपळून निघाले आहेत. अग्निशमन दलाच्या जवानांनी तिघांना सुखरुप बाहेर काढले आहे.

फॅक्टरीच्या पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर ही आग लागली, मात्र आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. जवळपास दोन तास ही आग धुमसत होती. या भीषण आगीच्या घटनेत अनेक जण होरपळून निघाले आहेत. अग्निशमन दलाच्या जवानांनी तिघांना सुखरुप बाहेर काढले आहे.

# तामिळनाडूमध्ये मुसळधार पाऊस, तर उत्तर भारतात बर्फवृष्टी

पश्चिमेकडे वातावरणात बदल झाले आहेत आन त्याचा परिणाम उत्तर भारतातील हवामानावर होत आहे.

**। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ निर्माण झाल्यामुळे तामिळनाडू आणि लगतच्या राज्यांमध्ये पाऊस पडत आहे. हवामान खात्याने चेन्नईसह काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे तामिळनाडूतील तीन जिल्ह्यांतील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 1 नोव्हेंबरला सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. प्रादेशिक हवामान केंद्राच्या मते, चेन्नईमध्ये आज साडेतीन इंच पेक्षा जास्त पाऊस झाला आहे. मागील 72 वर्षात तिसऱ्यांदा एवढा पाऊस पडला आहे.

IMD च्या अतिवृष्टीचा इशारा पाहता नागापट्टिनम, मायिलादुथुराई आणि तिरुवरूर जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालये आज बंद ठेवण्यात आले. चेन्नई हवामान खात्यानुसार, आज मुसळधार पावसासह ढगाळ वातावरण होते. चेन्नईच्या अनेक भागात आज मुसळधार पाऊस झाला. खाजगी हवामान एजन्सी स्कायमेटच्या म्हणण्यानुसार, दक्षिण पश्चिम बंगालच्या उपसागरात आणि श्रीलंकेच्या किनाऱ्यालगत चक्री चक्रीवादळाची परिस्थिती कायम आहे.

पश्चिमेकडे वातावरणात बदल झाले आहेत आन त्याचा परिणाम उत्तर भारतातील हवामानावर होत आहे. दरम्यान उत्तर भारतातील वातावरण बदलाची परिस्थिती 4 नोव्हेंबरपर्यंत जम्मू-काश्मीरमध्ये तयार होण्याची शक्यता आहे. त्याचाच प्रभावा म्हणून उत्तर भारतात पाऊस, बर्फवृष्टी आणि थंडी पडू शकते.ईशान्य मान्सून किनारी आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये मागील २४ तासांपासून सक्रिय आहे.

परिणामी, किनारी आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि केरळच्या काही भागांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला.

# अब्जावधी वर्षांपूर्वी मंगळावर होता विशाल महासागर; शास्त्रज्ञांच्या हाती लागले पुरावे

## सुमारे 350 दशलक्ष वर्षांपूर्वी मंगळ या लाल ग्रहाच्या पृष्ठभागावर एक विशाल महासागर अस्तित्वात होता

**। शांघाय । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



मंगळ हा ग्रह आज एक कोरडा आणि धुळीने माखलेला ग्रह मानला जातो. मात्र शास्त्रज्ञांनी असे काही पुरावे सापडले आहेत, ज्यात सुमारे 350 दशलक्ष वर्षांपूर्वी मंगळ या लाल ग्रहाच्या पृष्ठभागावर एक विशाल महासागर अस्तित्वात होता. हे दिसतेय. हा महासागर लाखो चौरस किलोमीटरपर्यंत विस्तृत होता असेही दिसले.

हा पुरावा शोरलाईन टोपोग्राफीच्या स्वरुपात समोर आला आहे. जो मंगळ ग्रहाच्या पृष्ठभागाच्या अनेक सॅटेलाईट फोटोंद्वारे ओळखला गेला आहे. हे फोटो थोड्या वेगळ्या अँगलनी घेत ड्रॅग करून रिलीफ मॅप बनवता येतो. जर्नल ऑफ जिओफिजिकल रिसर्च प्लॅनेटमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, संशोधकांनी नद्यांनी उंचावलेल्या 6,500 किमी पेक्षा जास्त फ्यूवियल रिज तयार केल्या आहेत. जे नद्यांमुळे वर आल्याचे दिसतेय. पेनसिल्व्हेनिया स्टेट युनिव्हर्सिटीचे भूवैज्ञानिक बेंजामिन कार्डेनास म्हणतात की, पृथ्वीवर कालांतराने साचणारा गाळ किंवा गाळ पाहून आपण जलमार्गाचा इतिहास रेखाटतो. त्याला आपण स्ट्रॅटेग्राफी म्हणतो. असेच काहीसे मंगळावर करण्यात आले आहे. 2007 मध्ये गोळा केलेल्या मार्स रिकॉनिसन्स ऑर्बिटरमधील डेटाचा वापर करून टीमने रिजची जाडी, कोन आणि स्थानांचे विश्लेषण केले. यामुळे त्यांना मंगळावरील एओलिस डोरसा प्रदेश म्हणून ओळखले जाणारे टोपोग्राफिकल डिप्रेशन समजू शकले. संशोधकांच्या म्हणण्यानुसार, मंगळाच्या या भागात वर्षांपूर्वी अनेक बदल होत होते. हा बदल समुद्राच्या पातळीत होणारी भरीव वाढ आणि खडकांच्या हालचालीत परावर्तित झाला आहे. सध्या सर्वात दाट प्रवाही रिज एओलिस डोर्सामध्ये आढळते.

नेचर जिओसायन्समध्ये प्रकाशित केलेल्या एका वेगळ्या अभ्यासात दिसते की, कार्डेनाससह तत्सम संशोधकांनी मेक्सिकोच्या खाडीतील प्राचीन समुद्राच्या तळांचा नकाशा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे अकूस्टिक इमेजिंग तंत्र मॉडेलवर लागू केले. यामुळे पाण्यामुळे मंगळावरील समुद्राचा पृष्ठभाग कसा नष्ट झाला हे शोधता येईल.

संशोधकांचे म्हणणे आहे की, मंगळावर एकेकाळी भरपूर पाणी असल्याचे सूचित करणारे बरेच पुरावे आम्हाला मिळत आहेत. मात्र या पाण्याचे काय झाले याचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. मात्र कोट्यवधी वर्षांपूर्वीचा काळ नेमक काय झालं हे पाहणे सोपे नाही.

# मेहुल चोक्सीला सेबीचा मोठा दणका; शेअर मार्केटमधील व्यवहारांवर 10 वर्षांसाठी बंदी

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाने ( SEBI) भारतातील फरार उद्योगपती मेहुल चोक्सीला मोठा दणका दिला आहे. सेबीने सोमवारी एक आदेश जाहीर केला आहे. त्या आदेशानुसार मेहुल



चोक्सीला सिक्युरिटी मार्केटमध्ये 10 वर्षांसाठी व्यापार करण्यास बंदी घातली आहे. यासोबत 5 कोटींचा दंडही ठोठावला आहे. चोक्सीला हा दंडाची रक्कम 45 दिवसांच्या आत जमा करावी लागणार आहे. असे सेबीने आपल्या आदेशात म्हटले आहे.

सिक्युरिटी अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाने (SEBI) गीतांजली जेम्स लिमिटेडच्या शेअर्सच्या फसवणुकीबाबत ही कारवाई केली आहे. चोक्सी हा गीतांजली जेम्सचा अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक होता. तसेच समूहाच्या प्रवर्तकांपैकी एक होता.

हे एक दशक जुनं आहे. जुलै 2011 ते जानेवारी 2012 दरम्यान सेबीने गीतांजली जेम्सच्या शेअर बाजारातील व्यवहाराबाबत तपास केला होता. ज्यात तो चुकीच्या व्यवहारात दोषी आढळला होता. ज्यानंतर चोक्सीला मे 2022 मध्ये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

सेबीने आपल्या आदेशात म्हटले की, चोक्सीने 15 कंपन्यांना निधी दिला होता, ज्यांना फ्रंट एंटिटी म्हटले जाते. या कंपन्यांशी चोक्सीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबंध होता. याच दरम्यान चोक्सीने 74.44 कोटी रुपये या कंपन्यांना हस्तांतरित केले, त्यापैकी 13.34 कोटी रुपयांचा वापर फसवणुकीसाठी करण्यात आला होता.

# “...अन् नेहमी तुझ्याशिवाय अपूर्ण राहील” अमृता खानविलकर

मराठीतील सिनेसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री म्हणून अमृता खानविलकरला ओळखले जाते. उत्तम अभिनय, कमालीचा डान्स आणि प्रत्येक भूमिकेला न्याय देणारी अभिनेत्री म्हणून तिची खास ओळख आहे. मराठी सिनेसृष्टीत अमृताचं नाव जितकं चर्चेत असतं तितकीच तिच्या नावाची बॉलिवूडमध्येही चर्चा असते. सध्या अमृता ही झलक दिखला जा असते. अमृताने आतापर्यंत अनेक मराठी चित्रपट, हिंदी चित्रपट, मालिका, वेबसीरीजमध्ये काम केले आहे. अमृताचा येत्या नोव्हेंबर महिन्यात वाढदिवस असतो. या निमित्ताने तिने एक पोस्ट शेअर केली आहे.अमृता ही इन्स्टाग्रामवर कायमच सक्रीय असते. नुकतंच अमृताने तिचा पती हिमांशू मल्होत्राबरोबरचा एक फोटो शेअर केला आहे. या पोस्टमध्ये तिने तिच्या वाढदिवसाबद्दल एक पोस्ट शेअर केली आहे. अमृताचा वाढदिवस हा २३ नोव्हेंबरला असतो. मात्र तिच्या या पोस्टमध्ये तिने वाढदिवसाचा महिना याबद्दल सांगितले आहे.

दरम्यान अमृता खानविलकरचा जन्म २३ नोव्हेंबर १९८४ रोजी झाला आहे. काही महिन्यांपूर्वी अमृता खानविलकरची प्रमुख भूमिका असलेला चंद्रमुखी हा चित्रपट चांगलाच गाजला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अनेक रेकॉर्ड ब्रेक केले. ‘चंद्रमुखी’ या चित्रपटात दिलखेचक अदांनी सर्वांना घायाळ करणाऱ्या नृत्यांगणेची प्रमुख भूमिका साकारली होती. यामुळे तिला चांगलची प्रसिद्धी मिळाली. विश्वास पाटील यांच्या ‘चंद्रमुखी’ या कादंबरीवर आधारित या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली होती.





# जान्हवी कपूरचं बॉडीकॉन ड्रेसमधील बोल्ड फोटोशूट

बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. अनेकदा ती तिचे ग्लॅमरस फोटो इंस्टाग्राम अकाउंटवर शेअर करत असते. नुकतंच तिने लाल रंगाच्या बॉडीकॉन ड्रेसमध्ये फोटोशूट केलं आहे. या फोटोंमध्ये जान्हवी सुपरहॉट दिसत आहे.



# ‘ब्रीद : इनटू द शॅडोज’मधील नित्या मेननचा नवा कॅरेक्टर टीझर प्रदर्शित

अमेझॉन प्राइम व्हिडिओच्या आगामी ‘ब्रीदः इनटू द शॅडोज’ सीझन 2ची चर्चा सर्वत्र असतानाच, प्राइम व्हिडिओने या मालिकेचा एक नवीन कॅरेक्टर टीझर प्रदर्शित केला आहे. या टीझरमध्ये नित्या मेननला आभाच्या भूमिकेत पाहायला मिळेल. मालिकेच्या पहिल्या सिझनमध्ये, प्रेक्षकांनी आभाला आपल्या कुटुंबाचे रक्षण करणारी एक प्रेमळ पत्नी आणि काळजी घेणारी आई म्हणून पाहिले. पण आता सीझन 2मध्ये, प्रेक्षकांना आभाचा कधीही न पाहिलेला अवतार पाहायला मिळेल, जिथे आपल्या कुटुंबाला वाईट लोकांपासून वाचवण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करते. या टीझरमध्ये ‘कोणतीही समस्या इतकी मोठी नसते, कि ती सोडवू शकत नाही!’ टिझरमध्ये आभाचा डायलॉग प्रेक्षकांना तिच्या हेतूंबद्दल नक्कीच विचार करायला भाग पाडेल.


या नवीन टिझरमध्ये, एका अनपेक्षित परिस्थितीत असलेली आभा, अविनाश आणि कुटुंबाला अविनाशच्या बदललेल्या अहंकारापासून वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न करताना दिसत आहे. आभाचा तिच्या कुटुंबाला जयच्या वाईट हेतूंपासून वाचवण्याच्या प्रयत्नांना यश येईल का? की ती आणखी गोंधळून जाईल? अबुदंतिया एंटरटेनमेंटद्वारे निर्मित, आठ भागांची हि मालिका मयंक शर्मा यांनी दिग्दर्शित केली असून, अर्शद सय्यद, विक्रम तुली, प्रिया सग्गी आणि अभिजित देशपांडे यांच्यासोबत सीझन 2ची सह-निर्मितीदेखील केली आहे. ‘ब्रीद: इनटू द शॅडोज’ सीझन 2हा एक साइकोलॉजिकल थ्रिलर आहे ज्यामध्ये अभिषेक बच्चन, अमित साध, नित्या मेनन, नवीन कस्तुरिया, सैयामी खेर आणि इवाना कौर मुख्य भूमिका साकारताना दिसतील. ही अमेझॉनची बहुप्रतिक्षित मालिका ९ नोव्हेंबर रोजी अमेझॉन प्राइम व्हिडिओवर भारतासह जगभरातील २४० देशांमध्ये रिलीज होईल.

# अजय देवगणच्या ‘भोला’ चित्रपटात झळकणार ‘ही’ दाक्षिणात्य अभिनेत्री!

बॉलिवूडचा सिंघम अभिनेता अजय देवगण सध्या चर्चेत आहे, त्याचा ‘थँक गॉड’ चित्रपट प्रदर्शित झाला आहे. ‘थँक गॉड’मध्ये तो चित्रगुप्ताची भूमिका साकारताना दिसत आहे. या चित्रपटात अजय देवगणसह सिद्धार्थ मल्होत्रा आणि राकुल प्रीतची महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. २५ ऑक्टोबर रोजी हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. या चित्रपटाकडून निर्मात्यांना खूप अपेक्षा होत्या परंतु गेल्या तीन दिवसात फारशी चांगली कमाई करू शकला नाही.

‘थँक गॉड’नंतर अजय देवगणचा ‘दृश्यम २’ हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. २०१४ साली आलेल्या ‘दृश्यम’ चित्रपटाचा पुढील भाग असणार आहे. तसेच अजय देवगण पुन्हा एडका दिग्दर्शनाकडे वळला आहे. अजय देवगण भोला हा चित्रपट दिग्दर्शित करत आहे. या चित्रपटात अभिनेत्री तब्बूदेखील आहे. या चित्रपटात ती पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारताना दिसणार आहे. याच चित्रपटात आता एक दाक्षिणात्य अभिनेत्री दिसणार आहे. पिंकव्हिलाच्या माहितीनुसार अभिनेत्री अमला पॉल या चित्रपटात एका महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. अजयच्या माहितीनुसार डिसेंबर महिन्यात ती चित्रपटाच्या चित्रीकरणात सामील होईल. अमला पॉलने प्रामुख्याने तामिळ, मल्याळम आणि तेलगू चित्रपटांमध्ये काम केले आहे.





# 2 डिसेंबरपासून पुन्हा लॉकडाउन?

मराठीमधील बोल्ड अन् बिनधास्त अभिनेत्री म्हणजे सई ताम्हणकर. तिने अभिनयातदेखील सरस आहोत हे दाखवून दिले आहे. सईने फक्त मराठी चित्रपट, मालिका, वेबसीरिमध्ये अडकून न राहता हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केलं आहे. हंटर या चित्रपटातून तिने पहिल्यांदा हिंदीत काम केले आहे. त्यानंतर क्रिती सॅनॉनबरोबर मिमी चित्रपटात झळकली होती. आता तिचा नवा हिंदी चित्रपट लवकर प्रदर्शित होणार आहे.

सईने आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटनवरून फोटो शेअर करत ही माहिती दिली. दिग्दर्शक मधुर भांडारकर यांच्या ‘इंडिया लॉकडाउन’ या बहुचर्चित चित्रपटाचे पोस्टर तिने पोस्ट केले आहे. या पोस्टरमध्ये ती कोणत्याही ग्लॅमर अवतारात नस दिसता साध्य अवतारात दिसत आहे. तिच्याबरोबरीने पोस्टरमध्ये प्रतीक बब्बर, प्रकाश बेलवडी, श्वेता बसू प्रसाद, आहाना कुमराहे कलाकार दिसत आहेत. सगळे एका कुलुपात अडकले आहेत असे दाखवण्यात आले आहे. चित्रपटाच्या नावावरूनच हा चित्रपट नेमका कशावर आधारित असणार आहे हे प्रेक्षकांना समजले आहे. २०२० साली भारतात करोना महामारीमुळे लागलेल्या ताळेबंदीवर हा चित्रपट आधिरीत असणार आहे. विषयांवर भाष्य करणारे दिग्दर्शक म्हणजे मधुर भांडारकर त्यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. याआधी त्यांनी चांदनी बार, फॅशन, पेज ३ सारख्या चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. ‘इंडिया लॉकडाउन’ या चित्रपटाची निर्मिती पीईएन स्टुडिओज, मधुर भांडारकरचे भांडारकर एंटरटेनमेंट आणि प्रणव जैन यांच्या पीजे मोशन पिक्चर्सचे डॉ. जयंतीलाल गडा यांनी केली आहे. मधुर भांडारकरबरोबर अमित जोशी आणि आराधना साह यांनी चित्रपटाचे लेखन केले आहे. या चित्रपटाचा प्रीमियर २ डिसेंबर रोजी झी ५ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर होणार आहे.



# श्रीलंकेचा सहा गडी राखून विजय

**मुंबई ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

आयसीसी टी२० विश्वचषक २०२२ चा ३२ वा सामना अफगाणिस्तान आणि श्रीलंका यांच्यात ब्रिस्बेनच्या गाब्बा स्टेडियमवर खेळला गेला. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. या सामन्यात अफगाणिस्तानने २० षटकात आठ बाद १४४ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल श्रीलंकेने १८.३ षटकात हे आव्हान गाठत अफगाणिस्तानवर सहा गडी राखून विजय मिळवला. या विजयाने श्रीलंकेचे उपांत्य फेरीत पोहचण्याच्या आशा अजूनही कायम आहेत. अफगाणिस्तान मात्र उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे.

श्रीलंकेने अफगाणिस्तानवर मात करत सुपर-१२ मध्ये दुसरा विजय नोंदवला. त्याचे आता चार सामन्यांत चार गुण झाले आहेत. ते अजूनही उपांत्य फेरीच्या शर्यतीत आहे. दुसरीकडे या पराभवानंतर अफगाणिस्तानचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. त्याचे चार सामन्यांत केवळ दोन गुण आहेत. जरी त्यांनी एक सामना जिंकला तरी केवळ त्यांचे चार गुण होऊ शकतील. अफगाणिस्तानला आता न्यूझीलंडविरुद्ध खेळायचे बाकी राहिले आहे. उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडणारा अफगाणिस्तान हा दुसरा संघ आहे.



# इंग्लंडचा न्यूझीलंडवर 20 धावांनी विजय!

## बटलर सेनेच्या उपांत्य फेरीतील आशा कायम

**मुंबई ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

आयसीसी टी२० विश्वचषक २०२२ च्या ३३व्या सामन्यात इंग्लंड आणि न्यूझीलंडचे संघ आमनेसामने होते. इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने ब्रिस्बेनच्या गाबा स्टेडियमवर नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. इंग्लंडने २० षटकांत ६ बाद १७९ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल न्यूझीलंड संघ केवळ १५९ धावा करू शकला. उपांत्य फेरीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या सामन्यात दोन्ही संघांनी विजयासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, इंग्लंडने अखेरच्या पाच षटकात शानदार गोलंदाजी करत सामना २० धावांनी खिशात घातला. यासह इंग्लंडने उपांत्य



फेरीसाठीच्या आपल्या आशा जिवंत ठेवल्या. धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंड संघाकडून ग्लेन फिलिप्सने ३६ चेंडूत ६२ धावा केल्या. ख्रिस जॉर्डनच्या जागी संघात स्थान मिळालेल्या गोलंदाज सॅम करनने त्याला लॉंग ऑनवर झेलबाद केले. याआधी ख्रिस वोक्सने डॅरिल मिशेलला तंबूत पाठवले. त्याचा झेलही जॉर्डनने लॉंग ऑनवर घेतला तो काही काळासाठी क्षेत्ररक्षण करण्यासाठी आला होता. मिशेलला केवळ ३ धावा करता आल्या. शेवटच्या ५ षटकात ५७ धावांची गरज असताना आधी वूडने तीन धावा व मिचेलचा बळी तर वोक्सने ५ धावा देत निशामला बाद करत इंग्लंडला सामन्यात पुढे केले. आणखी वेगाने धावा करण्याच्या प्रयत्नात फिलिप्स बाद झाला व न्यूझीलंडच्या आशांना सुरुंग लागला. त्याने ३६ चेंडूवर ६२ धावांची वादळी खेळी केली. शेवटी न्यूझीलंडचा डाव ६ बाद १५९ धावांवर मर्यादित राहिला. बटलरला त्याच्या शानदार फलंदाजीसाठी सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

### ग्रुप ए मधील समीकरण

या विजयासह इंग्लंडचा संघ गट एकमधून उपांत्य फेरी गाठण्याच्या शर्यतीत कायम आहे. आता न्यूझीलंड, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचे प्रत्येकी पाच गुण आहेत.

तिन्ही संघांनी प्रत्येकी चार सामने खेळले असून अजून एक सामना खेळायचा आहे. तीन संघांचा प्रत्येकी एक सामना पावसामुळे वाहून गेला. न्यूझीलंड चार सामन्यांतून दोन विजय आणि एक पराभवासह पाच गुणांसह पहिल्या स्थानावर आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही